# नाशिक महानगरपालिका, नाशिक
# उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
## मानधन तत्वावरील "उद्यान निरीक्षक" जागांसाठी भरती प्रक्रिया
## जाहिरात

नाशिक महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग अंतर्गत उद्यान निरीक्षक पदे मानधन पध्दतीने भरण्यासाठी अर्हता धारक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व संबधित उमेदवारांनी किमान शैक्षणिक अर्हता धारण करत असल्यास आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रासह जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन जाहिरातीमध्ये विहित नमुन्यातील असलेला अर्ज / संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला विहित नमुन्यातील अर्ज डाऊनलोड करुन सादर करावा. अर्ज कार्यालयीन सुटी व सार्वजनिक सुटटी वगळुन सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.१३/०६/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत असेल. यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. परंतु अर्ज स्विकारणेच्या अंतिम वेळेबाबत स्थानिक परिस्थितीप्रमाणे बदल करण्याचा अधिकार निवड समितीस असेल. जाहिरात मुदतीत प्राप्त अर्जाची छाननी करुन यादी मुलाखतीसाठी मनपाच्या नोटिस बोर्डवर तसेच मनपाच्या www.nmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्या दिवशी मुलाखतीच्या बाबत गुणपत्रिका तयार करुन पात्र उमेदवारांची यादी मनपाच्या नोटिस बोर्डवर व www.nmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण व वेळ** :- उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग २ रा मजला, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड,नाशिक. वेळ सकाळी १०.०० ते ५.००

**मुलाखतीचे ठिकाण** :- सकाळी १०.०० ते ५.०० दि. २८/०६ / २०२३ रोजी स्थायी समिती, मिटींग हॉल २ रा मजला, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक

१. अर्जाची छाननी झाल्यानंतर मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी www.nmc.gov.in या संकेत स्थळावर तसेच मुख्य प्रवेशद्वाराजवळील, नोटिस बोर्ड, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक येथे लावण्यात येईल. पात्र उमेदवारांच्या मुलाखती दि.२८/०६/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० वेळेत घेण्यात येतील.

२. मुलाखतीस पात्र उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविणेत येणार नाही.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **किमान शैक्षणिक अर्हता** | **वय दिनांक ०१/०६/२०२३** | **एकुण पद संख्या** | **एकत्रित मासिक मानधन** |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्यान निरिक्षक | बी.एस्सी.(कृषी) अथवा बी.एस्सी (उद्यानविद्या अथवा बी.एस्सी (फॉरेस्ट्री) (नियमित ४ वर्षाचा अभ्यासक्रम पुर्ण झालेले) | ४५ वर्षापर्यत (सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी ६० वर्षापर्यत) | ७<br>अनुसूचित जाती-१<br>अनुसूचित जमाती-१<br>वि.भ.ज.-१<br>ई.डब्ल्यु.एस.-१<br>खुला -३ | ३०,०००/- |

**अटी व शर्ती** :-

१. उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग मनपा, नाशिक अंतर्गत भरण्यात येणाऱ्या सर्व उद्यान निरीक्षकांची निवड मुलाखत पध्दतीने करण्यात येईल.

२. सदरील पदांचा मनपा, नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३. सदरील पदे ही निव्वळ मानधनावर भरवयाचे आहेत.सुरुवातीस निवड झालेल्या उमेदवारांना ६ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात कामाचे आदेश दिले जातील.

४. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकीय,निमशासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरला जाईल.

५. मुलाखतीस पात्र उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे व सर्व प्रमाणपत्रांची सांक्षाकित सत्य प्रतीसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

- पासपोर्ट साईज फोटो-२, जन्म तारखेकरीता (वयाचा दाखला/दहावीचे टि.सी./जन्मपत्र)
- आयडी-मतदान ओळख पत्र/आधार कार्ड इ.शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, शेवटच्या वर्षाची / अंतीम गुणपत्रिका.
- अनुभवाचे प्रमाणपत्र,मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्रे मुळ सत्य प्रत, सांक्षाकित प्रत.

६. अर्ज छाननी अंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.

७. पात्रतेसाठी एकुण १०० गुण असतील व त्याची विभागनी खालील प्रमाणे असेल.

| **अ.नं.** | **तपशिल** | **गुण** |
|---|---|---|
| १. | पदवी/पदव्युत्तर पदविका/ पदव्युत्तर पदवी शेवटच्या वर्षाच्या/ अंतीम गुणानुसार | ८० गुण |
| २. | पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त १ गुण, पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त २ गुण | जास्तीत जास्त ५ गुण |
| ३. | १ वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, १ ते २ वर्ष अनुभव असल्यास १ गुण, २ ते ३ वर्ष अनुभव असल्यास २ गुण, याप्रमाणे पुढील प्रत्येक वर्षासाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरला जाईल. | जास्तीत जास्त ५ गुण |
| ४. | विशेष ज्ञान (मुलाखत) | १० गुण |
| | **एकुण गुण** | **१०० गुण** |

८. उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार यांना प्राधान्य देण्यात येईल.

९. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राज्यकिय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१०. नियुक्ती बाबतचा अंतिम अधिकार आयुक्त तथा प्रशासक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
आयुक्त तथा प्रशासक,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# अर्ज

प्रति,
मा.आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक.

फोटो

१ पदाचे नांव
------------------------------------------------------------------------------

२ उमेदवाराचे नांव
------------------------------------------------------------------------------

३ पत्रव्यवहाराचा पत्ता
------------------------------------------------------------------------------

४ भ्रमणध्वनी :-

५ ई-मेल आय डी :-

६ जन्मतारीख :-

७ वय (दि. / /२०२३ रोजीचे वय) :-

८ लिंग :- स्त्री / पुरुष

९ शैक्षणिक पात्रता :-

१० जात व संवर्ग :-

| अ.नं. | शैक्षणिक पात्रता | परिक्षा मंडळ/ विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

१० अनुभव असल्यास :- तपशील व कालावधी देणे

| अ.नं. | काम केलेल्या संस्थेचे नांव | कालावधी वर्षामध्ये | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे :-

१) ५)
२) ६)
३) ७)
४) ८)

ठिकाणी :-
दिनांक :- / /२०२३

अर्जदाराची स्वाक्षरी